# श्रीस्थानक राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार नियम

अ) पुरस्कार

1. पुरस्काराचे नाव 'श्रीस्थानक राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार' असे राहील.

2. पुरस्कार राज्यस्तरीय असतील आणि ते दरवर्षी प्रदान करण्यात येतील.

2. चरित्र-

आत्मचरित्र, कादंबरी, कथा, कविता, अनुवाद, विनोद, पर्यावरण, इतिहास, प्रवासवर्णन, विज्ञान-तंत्रज्ञान, समीक्षा - संशोधन, बालसाहित्य / नाटक या साहित्यप्रकारांचा समावेश राहील. प्रत्येक साहित्य प्रकाराला स्वतंत्रपणे पुरस्कार प्रदान करण्यात येतील

3. प्रकाशित साहित्य हे पुस्तक रुपाने असावे.

4. प्रकाशित पुस्तक मराठी भाषेतच असावे.

5. 1 जानेवारी ते 31 डिसेंबर या कालावधीत प्रकाशित झालेल्या पहिल्या आवृत्तीचा पुरस्कारासाठी विचार करण्यात येईल. पुढील प्रत्येक वर्षी 1 जानेवारी ते 31 डिसेंबर हाच कालावधी ग्राह्य धरण्यात येईल.

6. पुस्तक पाठविण्याची मुदत 28 फेब्रुवारी पर्यंत राहील.

7. लेखक/ प्रकाशक / संपादक हे साहित्य पाठवू शकतील.

8. प्रकाशित पुस्तकाच्या प्रत्येकी दोन प्रती पाठवाव्यात.

9. एकावेळी एकापेक्षा अधिक साहित्यप्रकारात सहभागी होता येईल.

10. एकावेळी एकापेक्षा अधिक पुरस्कार एकाच लेखकास जाहीर झाले तरी एकच पुरस्कार देण्यात येईल.

11. ज्या साहित्यप्रकारात पुरस्कार प्राप्त झाला आहे त्याच साहित्य प्रकारासाठी पुन्हा संबंधित लेखकाचे पुस्तक ग्राह्य धरले जाणार नाही.

12. प्राप्त झालेली पुस्तके परत पाठविली जाणार नाहीत.

13. पुरस्काराचे स्वरूप रक्कम रुपये पाच हजार व प्रमाणपत्र असे राहील.

14. अनुवादाखेरीज इतर साहित्य स्वतंत्र असल्याचा दाखला सोबत असावा.

15. लेखकाचा अल्पपरिचय, पत्ता, संपर्क क्रमांक आदी तपशील सोबत असावा,

16 . ' पुरस्कारासाठी ' असा स्पष्ट उल्लेख टपालाच्या पाकिटावर असावा.

17. परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील.

18. पुरस्कारासाठी कुठलेही प्रवेश शुल्क वा प्रवेशिका नाही.

19. पुरस्कार प्राप्त लेखकांना स्वतंत्रपणे पुरस्काराची माहिती देण्यात येईल.

20. एकूण सर्व पुरस्कारांची माहिती वृत्तपत्रातून जाहीर करण्यात येईल.

21. पुरस्कार स्वीकारण्यासाठी येणाऱ्या लेखक/ प्रकाशक / संपादक यांच्यापैकी एकाचा द्‌वितीय श्रेणी रेल्वे / बसचा प्रवास खर्च देण्यात येईल. त्यासाठी तिकिटाची सत्यप्रत सादर करावी लागेल.

22. पुरस्कार वितरण सोहळा मराठी ग्रंथसंग्रहालय, ठाणे येथे संस्थेच्या वर्धापन दिनी म्हणजेच दिनांक 1 जून रोजी अथवा नवरात्री नंतरच्या शारदोत्सवात होईल.

23. पुरस्कार स्वीकारण्यासाठी पुरस्कार प्राप्त संबंधिताने स्वतः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

24. काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहणे शक्य नसेल तर तसे संबंधिताने संस्थेस कळविणे आवश्यक आहे. संबंधिताच्या विनंतीनुसार व सोईनुसार नंतर पुरस्कार प्रदान करण्यात येईल.

25. पुरस्कार टपालाने पाठविला जाणार नाही.

26.पुरस्काराची रक्कम धनादेशाद्वारे प्रदान करण्यात येईल.

27. कुठल्याही साहित्यप्रकारात साहित्यकृती प्राप्त झाली नाही तर त्यावर्षी तो पुरस्कार बाद समजला जाईल.

28. कुठल्याही साहित्यप्रकारात परीक्षकांच्या मते पुरस्कार योग्य साहित्यकृती नसेल तर त्या वर्षी तो पुरस्कार बाद समजला जाईल.

पत्ता : कार्यवाह, मराठी ग्रंथसंग्रहालय, जिल्हा परिषद कार्यालयासमोर, सुभाष पथ, ठाणे (पश्चिम) 4 0 0 6 0 1.
संपर्क क्रमांक 0 9768257575 / 9326664770 / 8779696796